क्र.साप्रवि/सेप्र/न.क्र.४१/

**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.**
एस्ट्रेला बॅटरीज विस्तारित इमारत,
तळ मजला, धारावी रोड, माटुंगा,
**मुंबई - ४०० ०१९.**

महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.

# प्रशासकीय परिपत्रक क्र. १८३ दिनांक १३ / १० /२००८

विषय : अपंग कर्मचाऱ्यांना वेतनगट ३ व ४ मधील पदांवर पदोन्नतीमध्ये दिलेल्या ३% आरक्षणाच्या अमंलबजावणीबाबत.

संदर्भ : १) प्रशासकीय परिपत्रक क्र. २, दिनांक ४/१०/२००५ चे शुध्दीपत्रक.
२) प्रशासकीय परिपत्रक क्र. १६६, दिनांक १२/०८/२००८

-----

उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग,मंत्रालय कामगार विभाग यांनी त्यांच्या शासन निर्णय क्र. ईएसटी-००४/ सीआर-८३९२/ऊर्जा-६, दिनांक २३/०६/२००८ सोबत जनहित याचिका क्र. १२९/०३ संदर्भात मा. उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार पुनर्रचित करण्यात आलेल्या तज्ञ समितीने शासन निर्णयाच्या पुनर्विलोकनानंतर केलेल्या शिफारशी विचारात घेऊन तसेच महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाचे त्रिभाजन झाल्यामुळे यापूर्वीचा दिनांक २८/०९/२००४ चा शासन निर्णय अधिक्रमित करुन महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीमधील अपंगासाठी सुयोग्य सुधारित पदनिश्चिती केलेल्या पदांच्या यादीची सुधारित प्रत प्रशासकीय परिपत्रक क्र. १६६, दिनांक १२/०८/२००८ अन्वये पाठविण्यात आलेली असून शारीरिकदृष्ट्या अपंग व्यक्तीसाठी आरक्षित व निश्चित केलेल्या सुयोग्य पदांवर विभागीय पदोन्नतीद्वारे आणि सरळसेवेने भरती करताना सुधारित सूचनाचा अवलंब करणे आणि आरक्षण निश्चित करण्याबाबतच्या सूचना देण्यात आलेल्या आहेत.

२. आता उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, महाराष्ट्र शासन यांनी त्यांचे पत्र क्र. संकीर्ण-०९०८/ सं.क्र.१४८५/प्रशा-४, दि.१२/०९/२००८ सोबत शासन परिपत्रक क्र. अपंग-१००८/प्र.क्र.१११/०८/१६-अ, दि. ०८/०९/२००८ पाठविलेले असून वेतनगट ३ व ४ मधील अंध/अल्पदृष्टी, कर्धबधिर, अस्थिव्यंग किंवा मेंदूचा पक्षघात या अपंग कर्मचाऱ्यांना पदोन्नतीत प्रत्येकी १% या प्रमाणे एकूण ३% पदोन्नतीमधील हे आरक्षण वेतनगट ३ मधून वेतनगट ३ मधील पदावर, वेतनगट ४ मधून वेतनगट ४ मधील पदावर आणि वेतनगट ४ मधून वेतनगट ३ मधील पदावर अपंगाच्या नियुक्तीस योग्य ठरविलेल्या पदाकरिता अपंग कर्मचाऱ्यांचा पदोन्नतीसाठी विचार करण्याबाबतच्या सूचना दिलेल्या असून त्यानुसार कार्यवाही करण्याचे आदेश दिलेले आहेत.

३. शासन परिपत्रक क्र. अपंग-१००८/प्र.क्र.१११/०८/१६-अ, दि. ०८/०९/२००८ ची प्रत माहितीसाठी मार्गदर्शनासाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी सोबत जोडली आहे. सर्व संबंधितांना विनंती करण्यात येते की त्यांनी शारीरिकदृष्ट्या अपंग व्यक्तींकरिता योग्य ठरविलेल्या पदावर विभागीय पदोन्नतीद्वारे नियुक्ती करण्याकरिता सुधारित सूचनांचा अवलंब करावा.

४. हे प्रशासकीय परिपत्रक कंपनीच्या www.mahadiscom.in या वेबसाईटवरही उपलब्ध आहे.

सोबत : उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, महाराष्ट्र शासन
यांचे पत्र क्र. संकीर्ण-०९०८/ सं.क्र.१४८५/प्रशा-४,
दि.१२/०९/२००८ (पृष्ठ १ ते ३)

**(सु.य.पाटील)**
**मुख्य महाव्यवस्थापक (क)**

प्रत :
म.रा.वि.वितरण कंपनी मर्यादितच्या विभागीय कार्यालय व त्यावरील सर्व स्तरापर्यंत.

C:\RC\File-४१.doc

ED/HR/ 516
Date 18/9/08

2327
12/9/08

क्रमांक संकीर्ण-०९०८/सं.क्र. १२८५/प्रशा-४
उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक - १२ सप्टेंबर २००८.

G/99
19/9/08

महाव्यवस्थापक (आस्था)
आवक क्र.:- T/3043
दिनांक :- 20/9/08

प्रति,

विकास आयुक्त,उद्योग संचालनालय,मुंबई.
संचालक,शासकीय मुद्रण ,लेखन सामग्री प्रकाशन संचालनालय,मुंबई.
कामगार आयुक्त,मुंबई.
कल्याण आयुक्त, महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ, मुंबई.
संचालक,औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालय,ताडदेव, मुंबई.
संचालक, बाष्पके संचालनालय, मुंबई.
संचालक, श्रम विज्ञान संस्था, मुंबई.
प्रबंधक,औद्योगिक न्यायालय, मुंबई.
मुख्य कार्यकारी अधिकारी,महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ,मुंबई.
व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य वित्तीय महामंडळ, मुंबई.
व्यवस्थापकीय संचालक, पट्रोकेमिकल्स महामंडळ मर्यादित, मुंबई.
व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य लघु उद्योग महामंडळ, मुंबई.
मुख्य कार्यकारी अधिकारी,महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ, मुंबई
मुख्य अभियंता, (विद्युत), सा.बां.विभाग, मुंबई.
व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य विद्युत धारक कंपनी लिमिटेड, मुंबई.
व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य ऊर्जा नियामक आयोग, मुंबई.
संचालक, महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरण, पुणे.
संचालक, भूविज्ञान व खनिकर्म संचालनालय, नागपूर.
व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य विद्युत निर्मिती कंपनी, मुंबई.
व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य पारेषण कंपनी,मुंबई
व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य वितरण कंपनी,मुंबई
व्यवस्थापकीय संचालक, कोकण विकास महामंडळ मर्यादित, मुंबई.
व्यवस्थापकीय संचालक, पश्चिम महाराष्ट्र विकास महामंडळ मर्यादित, पुणे.
व्यवस्थापकीय संचालक, मराठवाडा महाराष्ट्र विकास महामंडळ मर्यादित, औरंगाबाद.
व्यवस्थापकीय संचालक, विदर्भ विकास महामंडळ मर्यादित, नागपूर.

विषय:- अपंग कर्मचा-यांना गट- क व गट- ड पदांवर पदोन्नतीमध्ये दिलेल्या ३ % <u>आरक्षणाच्या अंमलबजावणीबाबत.</u>

उपरोक्त विषयावरील सा.प्र. वि. परिपत्रक क्र.अपंग-२००८/ प्र.क्र.१११/०८/१६-अ दि. ८/९/२००८ ची प्रत सोबत जोडली आहे.

२. कृपया सदर परिपत्रकात नमूद केल्याप्रमाणे कार्यवाही करावी, ही विनंती.

(य. टे. पाडवी)
कक्ष अधिकारी

उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
फाईल क्र. [illegible]
दिनांक [illegible]

**अपंग कर्मचा-यांना गट क व गट ड पदांवर पदोन्नतीमध्ये दिलेल्या ३% आरक्षणाच्या अमंलबजावणीबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**सामान्य प्रशासन विभाग,**
**शासन परिपत्रक, क्रमांक : अपंग-१००८/प्र.क्र.१११/०८/१६-अ,**
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
**दिनांक : ८.९.२००८.**

<u>वाचा</u>:- १) शासन परिपत्रक,सामान्य प्रशासन विभाग, क्र.-एसआरव्ही-१०९७/प्रक्र.१२/९७/१६अ, दि.२.५.१९९८,
२) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र.-एसआरव्ही-१०९९/प्रक्र.३७/९९/१६अ, दि. ५.३.२००२,
३) केंद्र शासनाचे ऑफिस मेमोरेंडम, क्र.-३६०३५/३/२००४/Estt (Res),दि. २९.१२.२००५,
४) शासन पत्र, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, क्र.-अपंग २००२/प्रक्र.३३१/सुधार-३, दि. ७.६.२००६,
५) शासन परिपत्रक सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, क्र.-अपंग २००७/प्रक्र.६१/सुधार-३, दि.२०.४.२००७,
६) शासन शुध्दीपत्रक सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, क्र.-अपंग२००७/प्रक्र.६१/सुधार-३, दि.२५.५.२००७,
७) शासन परिपत्रक, क्र.-न्याय-२००७/स.न्या/प्रक्र १०३/१६अ, दि.१९.१०.२००७.

<u>प्रस्तावना</u> :- अपंग व्यक्ती (समान संधी, संपूर्ण सहभाग व हक्कांचे संरक्षण ) अधिनियम, १९९५ (१९९६ चा १ ) हा अधिनियम जम्मू व काश्मिर राज्य वगळता, संपूर्ण देशामध्ये दि. ७ फेब्रुवारी, १९९६ पासून लागू करण्यात आला आहे.

२. संदर्भाधिन दि.२.५.९८ च्या परिपत्रकासोबतच अधिनियमातील ३२ आणि ३३ चे उतारे जोडून सर्व नियुक्ती अधिका-यांना पाठविले आहेत. त्यानुसार अधिनियमाच्या कलम ३२ नुसार राज्य शासनाने अपंगासाठी आपल्या आस्थापनेवरील जी पदे आरक्षित करता येतील ती पदे शोधून काढून निश्चित करणे आवश्यक आहे. सदर अधिनियमाच्या कलम ३३ नुसार अपंगांचे नियुक्तीसाठी किमान ३ टक्के पदे आरक्षित करणे आवश्यक आहे. त्यापैकी प्रत्येकी एक टक्का पदे अनुक्रमे १) अंध/अल्पदृष्टी २) बहिरेपणा ३) अस्थिव्यंग किंवा मंदमती या व्याधींने ग्रस्त असलेल्या व्यक्तीसाठी राखून ठेवणे आवश्यक आहे. या कलमात विशिष्ट कामाचे स्वरुप पहाता, ज्या आस्थापनेवर अपंगांसाठी आरक्षण करणे शक्य नाही. अशा बाबतीत सूट देण्याची तरतूद करण्यात आली आहे.

३. संदभाधीन दि.५.३.२००२ च्या शासन निर्णयान्वये राज्य शासनाच्या सेवेतील गट "क" व गट "ड" मधील अंध / अल्पदृष्टी, कर्णबधिर, अस्थिव्यग किंवा मेंदूचा पक्षघात या अपंग कर्मचाऱ्यांना पदोन्नतीत प्रत्येकी १ टक्का याप्रमाणे एकूण ३ टक्के आरक्षण विहित करण्यात आले आहे. पदोन्नतीमधील हे आरक्षण गट "क" मधून गट "क" पदावर, गट "ड" मधून गट "ड" पदावर आणि गट "ड" मधून गट "क" पदावर अपंगाच्या नियुक्तीस योग्य ठरविलेल्या पदांकरीता असेल. व अपंग कर्मचा-यांचा पदोन्नतीसाठी विचार करताना शासनाने वेळोवेळी विहित केलेले पदोन्नतीसंबंधातील नियम, आदेश व निकष (उदा.पदोन्नती लगतच्या पदावरील किमान सेवेचा कालावधी, विहित विभागीय/सेवा प्रवेशोत्तर प्रशिक्षण परीक्षा, गोपनीय अहवाल इ.) यानुसार कार्यवाही करण्याचेही आदेश दिलेले आहेत.

४. सामाजिक न्याय,सांस्कृतिक कार्य व विशेष सहाय्य विभागाच्या पत्र क्रमांक-अपंग-२००२/प्र.क्र.३३१/ सुधार-३, दि.७.६.२००६ च्या पत्रान्वये पुढीलप्रमाणे सूचना सर्व प्रशासकीय विभागांना देण्यात आल्या आहेत.

१) अपंगासाठी आरक्षित पदे भरण्यासाठी तसेच अपंगाचा अनुशेष मोजतांना अपंग व्यक्ती अधिनियम १९९५ अमंलात आल्यानंतर निर्माण झालेली रिक्त पदे विचारात घेण्यात यावीत.

२) वरील प्रयोजनार्थ केंद्र शासनाच्या दि. २९.१२.२००५ च्या परिपत्रकान्वये विहित केलेल्या मार्गदर्शक सूचना अमंलात आणाव्या.

सदर सूचना अंमलात आणण्यासाठी वरील दि.२९.१२.२००५ च्या परिपत्रकाची प्रत वरील दि.५.५.२००६ च्या पत्रासोबत जोडली होती व सदर पत्रातील सूचना सर्व प्रशासकीय विभागांनी त्यांच्या अधिनस्त असलेल्या सर्व कार्यालये, महामंडळे व संस्थांना निर्गमित कराव्यात असे कळविले होते.

५. अपंगांना पदोन्नती देण्याची कार्यवाही होण्यासाठी सदर सूचना पुन्हा खालीलप्रमाणे देण्यात येत आहेत :-

**शासन परिपत्रक :-**

अपंग कर्मचाऱ्यांना गट "क" आणि गट "ड" मधील पदांवर पदोन्नती देण्यासाठी अपंग व्यक्ती अधिनियम, १९९५ (१९९६ चा - १) हा अधिनियम लागू झाल्यापासून म्हणजे दि.७.२.१९९६ पासून रिक्त होणारी पदे विचारात घेऊन कार्यवाही करण्याच्या सूचना पुन्हा देण्यात येत आहेत.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संगणक सांकेतांक २००८०८०८११३०२२००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

( दि. रो. डिंगळे )
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

राज्यपाल यांचे सचिव,
मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव,
उपमुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव,
सर्व मंत्री, राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
मुख्य सचिव,
शासनाचे सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/ सचिव,
* प्रबंधक, उच्च न्यायालय, मूळ न्याय शाखा, मुंबई,
* प्रबंधक, उच्च न्यायालय, अपील शाखा, मुंबई,
* प्रबंधक, महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई,
* प्रबंधक, लोकआयुक्त व उप लोकआयुक्त, मुंबई,
* सचिव,महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,
* सचिव, महाराष्ट्र विधान मंडळ सचिवालय,(विधान सभा) विधानभवन, मुंबई,
* सचिव, महाराष्ट्र विधान मंडळ सचिवालय,(विधान परिषद) विधानभवन, मुंबई,
* सचिव, राज्य निवडणूक आयोग,मुंबई,
सर्व विभागीय आयुक्त,
राज्यातील सर्व महामंडळे आणि उपक्रम यांचे व्यवस्थापकीय संचालक,
सर्व जिल्हाधिकारी,
सर्व महानगर पालिकांचे आयुक्त,
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
सर्व मुख्याधिकारी, नगर परिषदा/नगरपालिका,
संचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई,
अवर सचिव, सामाजिक न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई-३२,
आयुक्त, अपंग कल्याण, ३, चर्च रोड, पुणे,
सर्व मंत्रालयीन विभाग,
मंत्रालयीन विभागाच्या प्रशासकीय नियंत्रणाखालील सर्व विभाग प्रमुख/कार्यालय प्रमुख,
सामान्य प्रशासन विभागातील सर्व कार्यासने,
निवड नस्ती,
* पत्राने.

H-1924-1

--०--